# अखिल भारतीय मराठी नाटय परिषद

स्थापना: २८ ऑगस्ट १९०५
नोंदणी क्र. : ई — २६३५, अन्वये बी.पी.टी. ॲक्ट १९५०

## १०९ वा वार्षिक अहवाल व जमाखर्च

(१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६)

## आणि

## अंदाजपत्रक

(२०१६—१७)

—:कार्यालय:—

अखिल भारतीय मराठी नाटय परिषद
यशवंतराव चव्हाण नाटयसंकुल, तळमजला,
मनमाला टॅक रोड, मांटुगा—माहिम, मुंबई ४०० ०१६.
दूरध्वनी क्र. २४३००५९४/२४३७७६४९

# नियामक मंडळ २०१५—२०१६

**अध्यक्ष** — श्री. मोहन जोशी
**उपाध्यक्ष** — श्री. प्रमोद भुसारी (दिनांक १३ सप्टेंबर २०१५ पर्यत)
**प्रमुख कार्यवाह** — श्री. दीपक करंजीकर
**कोषाध्यक्षा** — श्रीमती लता नार्वेकर
**सहकार्यवाह** — श्री. भाऊसाहेब भोईर
श्री. सुनिल वणजु

**सदस्य**

| | | |
|---|---|---|
| श्री. नवनाथ कांबळी | श्री. प्रफुल्ल महाजन | श्री. सतीश लोटके |
| श्री. श्रीपाद जोशी | श्री. सुनिल ढगे | श्री. दिलीप देवरणकर |
| श्री. किशोर आयलवार | श्रीमती वीणा लोकुर | श्री. भरत लोळगे |
| श्रीमती नीना कुलकर्णी | श्रीमती सुकन्या कुलकर्णी—मोने | श्री. विजय केंकरे |
| डॉ. गिरीष ओक | श्रीमती वंदना गुप्ते | श्री. अरूण नलावडे |
| श्री. प्रमोद भुसारी (दि. १४ सप्टेंबर २०१५ पासून) | श्री. अशोक हांडे | श्री. चंद्रकांत कुलकर्णी |
| श्री. दिलीप कोरके | श्री. समीर हंपी | श्री. राजन भिसे |
| श्री. शफी नायकवडी | श्री. राजेंद्र जाधव | श्री. सुनिल महाजन |
| श्री. श्रीकृष्ण दळी | श्रीमती आसावरी शेटये | श्री. उदय सामंत (दिनांक ११ जुलै २०१५ पर्यंत) |
| श्री. अशोक ढेरे | ॲड. पराग लुले | श्री. नाथा चितळे |
| श्री. विजय कदम | श्री. शिवाजी शिंदे | श्री. दिलीप दळवी |
| श्री. रत्नकांत जगताप (घटक संघटना प्रतिनिधी) (दिनांक १३ सप्टेंबर २०१५ पर्यत) | श्री. विष्णू जाधव (घटक संघटना प्रतिनिधी) (दिनांक १८ ऑक्टोबर २०१५ पासून) | श्री. सुशांत शेलार (घटक संघटना प्रतिनिधी) |
| श्री. प्रभाकर (गोटया) सावंत(घटक संघटना प्रतिनिधी) | श्री. किरण कामेरकर (घटक संघटना प्रतिनिधी) | श्री. शशिकांत मोरे(घटक संघटना प्रतिनिधी) |

## कार्यकारी समिति २०१५—२०१६

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | — | श्री. मोहन जोशी |
| उपाध्यक्ष | — | श्री. प्रमोद भुसारी दिनांक १३ सप्टेंबर २०१५ पर्यत) |
| प्रमुख कार्यवाह | — | श्री. दीपक करंजीकर |
| कोषाध्यक्षा | — | श्रीमती लता नार्वेकर |
| सहकार्यवाह | — | श्री. भाऊसाहेब भोईर |
| | | श्री. सुनिल वणजु |

**सदस्य**

| | | |
|---|---|---|
| श्री. नवनाथ कांबळी | श्री. प्रफुल्ल महाजन | श्री. सतीश लोटके |
| श्री. श्रीपाद जोशी | श्री. सुनिल ढगे | श्री. दिलीप देवरणकर |
| श्री. किशोर आयलवार | श्रीमती वीणा लोकुर | श्री. विजय केंकरे |

## यशवंतराव चव्हाण नाटयसंकुल विश्वस्त

| | | |
|---|---|---|
| मा.ना. श्री. शरदरावजी पवार | डॉ. रवि बापट | श्री. शशी प्रभु |
| श्री. चारूदत्त सरपोतदार | श्री. बाळ कर्वे | |

बॅकर्स:— बॅक ऑफ महाराष्ट्र, सारस्वत को.ऑ. बॅक, मुंबई बॅक, कॉसमॉस बॅक, बॅन्क ऑफ इंडिया आणि कॉर्पोरेशन बॅन्क.

| | |
|---|---|
| मानद वास्तुशास्त्रज्ञ | : श्री. शशी प्रभु |
| लेखा परीक्षक | : श्री. रवि सावंत |
| कायदे सल्लागार | : ॲड. समीर गुप्ते |

अखिल भारतीय मराठी नाटय परिषद

यशवंतराव चव्हाण नाटयसंकुल, तळमजला,

मनमाला टॅंक रोड, माटुंगा—माहिम, मुंबई ४०० ०१६.

जा.क्र. ७५९/२०१६—१७ दिनांक : ११ जानेवारी २०१७

(फक्त सभासदांसाठी)

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेची इ. सन २०१५—१६ (१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६) ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक १२ फेब्रुवारी २०१७ रोजी दु. २.०० वा. परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांचे अध्यक्षतेखाली यशवंत नाटयमंदिर, मनमाला टॅंक रोड, माटुंगा—माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे होणार आहे. या सभेस उपस्थित राहून सहकार्य द्यावे, ही विनंती.

— सभेपुढील विषय —

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून सुधारणासह संमत करणे.
२. इतिवृत्तातून निर्माण होणा—या मुद्यांवर विचार करणे.
३. परिषदेच्या १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ या कालावधीचा वार्षिक अहवाल सादर करणे व संमत करणे.
४. परिषदेच्या १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ या कालावधीचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व संमत करणे.
५. अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
६. इ.सन २०१६—१७ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे व संमत करणे.
७. इ.सन २०१६—१७ या वर्षाकरिता हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. सभासदांकडून रीतसर आलेल्या ठरावांवर व सूचनांवर चर्चा घडवून बहुमताने निर्णय घेणे.
९. नाटयसंकुल प्रगतीचा आढावा घेणे व निधीविषयी विचार करणे.
१०. परिषदेच्या भावी कार्यासंबंधी विचार करणे.
११. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांची चर्चा करणे व ठराव संमत करून बहुमताने निर्णय घेणे.

आपला,

(दीपक करंजीकर)

प्रमुख कार्यवाह.

विशेष सूचना :

१. गणसंख्येअभावी ही सभा तहकूब झाल्यास पुन्हा ती सभा त्याच जागी अर्ध्या तासानंतर वरील कामकाजासाठी भरेल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२. ज्या सभासदांना अहवाल अगर जमाखर्चासंबंधी अधिक माहिती विचारावयाची असेल त्यांना ती महिती दि. २५ जानेवारी २०१७ ते ३१ जानेवारी २०१७ पर्यंत प्रतिदिनी दुपारी ४ ते सायं. ६ या वेळात परिषद कार्यालय, माटुंगा—माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे पुरविण्यात येईल.

३. वार्षिक सभेत ठराव/सूचना करावयाच्या असल्यास सूचक व अनुमोदक यांच्या सहीने ठरावासह त्या अर्थाची लेखी सूचना दि. २८ जानेवारी २०१७ पर्यंत परिषदेच्या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.

४. वार्षिक अहवाल शाखेच्या सभासदांसाठी शाखेच्या कार्यालयात, तसेच मुंबईतील सभासदांसाठी मध्यवर्ती कार्यालयात दिनांक २५ जानेवारी २०१७ ते पासून अवलोकनार्थ उपलब्ध होईल. व मागणी केल्यास उपलब्ध करून दिला जाईल.

### महत्वाचे निवेदन

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेची सभासद संख्या (शाखा सभासदांसहित) अठरा हजाराहून अधिक आहे. या सर्वांना अहवाल पाठविण्यास वाढलेला टपालखर्च करणे आर्थिक तरतुदीच्या अभावी अशक्य आहे. त्यामुळे प्रतिवर्षी होणारा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा, नाटय संमेलन, सत्कार आणि अन्य नाटय विषयक कार्यक्रम हे वृत्तपत्राव्दारे सभासदांना कळविण्यात येतील. सर्व सभासदांनी परिषदेला याबाबतीत सहकार्य करावे ही विनंती.

# अखिल भारतीय मराठी नाटय परिषद, मुंबई
# वार्षिक अहवाल २०१५—२०१६
(१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६)

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचा इ.सन २०१५—१६ सालचा वार्षिक अहवाल सादर करण्यास नियामक मंडळास अतिशय आनंद होत आहे.

## नियामक मंडळ सभा

नियामक मंडळाच्या एकूण सहा सभा झाल्या. या सभांना मुंबई व मुंबईबाहेरील बहुसंख्य सभासद उपस्थित होते. (उपस्थिती पान क्र. ७) सभेत महत्वाचे निर्णय घेण्यात आले.

## कार्यकारी समिती सभा

कार्यकारी समितीचे पदाधिकारी व सदस्य कार्यपरत्वे नाटय परिषदेच्या कार्यालयात हजर राहून निरपेक्ष भावनेने परिषदेचा कार्यभार सांभाळीत आहेत. त्यामुळे नाटय सृष्टीच्या सर्व घटकांचा परिषदेच्या कार्यालयाशी सातत्याने संपर्क साधला जात आहे. कार्यकारी समितीच्या एकूण अकरा सभा झाल्या. (उपस्थिती पान क्र. ६) १४ जून चा भव्य कलावंत मेळावा व पारितोषिक वितरण समारंभ, एकांकिका स्पर्धा, नाटयसंमेलन हे परिषदेचे महत्वपूर्ण उपक्रम होत.

## वार्षिक सर्वसाधारण सभा

परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ३१ जानेवारी २०१५ रोजी दुपारी २.०० वाजता परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांच्या अध्यक्षतेखाली अ.भा. मराठी नाटय परिषद, यशवंतराव चव्हाण नाटय संकुल, मनमाला टॅन्क रोड, माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे घेण्यात आली.

## आजीव सभासद

परिषदेची एकूण सभासद संख्या दि. ३१.०३.२०१६ अखेर २३५१७ झाली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| संस्था सभासद | १३ | उपकर्ते | ११ |
| आश्रयदाते | १० | हितचिंतक | ०७ |
| मध्यवर्ती आजीव सभासद | ४५६५ | सन्माननीय सभासद | ०८ |
| शाखा आजीव सभासद | १८९०३ | (शाखांची सदस्य संख्या पान क्र. ४ व ५ वर दर्शविल्याप्रमाणे आहे.) | |

## आर्थिक मदत

आवश्यकतेनुसार गरजू व वृध्द कलावंतांना नाटय परिषद आर्थिक सहाय्य करीत असते.

अखिल भारतीय मराठी नाटय परिषद, मुंबई

३१ मार्च २०१६ पर्यंतची शाखांची सदस्य संख्या

| क्र. | शाखेचे नाव | आजीव सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | अमरावती | १७२ |
| २ | अकोला | २८१ |
| ३ | अकलूज—माळशिरस | २२१ |
| ४ | अंबरनाथ | ११३ |
| ५ | अंबाजोगाई | १४७ |
| ६ | अहमदनगर | ४२७ |
| ७ | औरंगाबाद | १५३ |
| ८ | ऐरोली | ५२८ |
| ९ | बडोदा | ५८ |
| १० | बारामती | ५२ |
| ११ | बार्शी | १२५ |
| १२ | बीड | ४२४ |
| १३ | बेळगांव | ५२९ |
| १४ | बोरीवली | १५०२ |
| १५ | चिपळूण | ६२ |
| १६ | चिंतामणीनगर | ७७ |
| १७ | धुळे | ३५६ |
| १८ | दौंड | ५९ |
| १९ | डोंबिवली | १८८ |
| २० | फैजपूर | १०४ |
| २१ | इस्लामपूर | १६३ |
| २२ | इचलकरंजी | ८४ |
| २३ | जळगांव | ९२ |
| २४ | कराड | ५२ |
| २५ | कारंजा लाड | ५१९ |
| २६ | कोल्हापूर | ६२८ |
| २७ | कल्याण | १९७ |
| २८ | लातूर | ४६६ |
| २९ | मलकापूर — अकोला | ९० |
| ३० | महाबळेश्वर | ७५ |
| ३१ | मुक्ताईनगर | १५६ |
| ३२ | मालवण | ११९ |
| ३३ | मिरज | २४२ |
| ३४ | मानोरा | २७९ |
| ३५ | मंगळवेढा | २८९ |
| ३६ | मुळशी | ८५ |
| ३७ | मुलुंड | २११ |
| ३८ | नाशिक | १२४६ |
| ३९ | नांदेड | २९८ |
| ४० | नागपूर | ८५८ |
| ४१ | नागपूर महानगर | २०० |
| ४२ | नांदेड दक्षिण | ११० |
| ४३ | नवी मुंबई | ५४ |
| ४४ | पंढरपूर | ६४६ |
| ४५ | पनवेल | २०० |
| ४६ | पुणे | १३२३ |
| ४७ | पिंपरी—चिंचवड | ४६६ |
| ४८ | कोथरूड | १५४ |
| ४९ | रायगड | २२८ |
| ५० | रत्नागिरी | ४०४ |
| ५१ | संगमनेर | १११ |
| ५२ | सोलापूर | ४६६ |
| ५३ | सोलापूर महानगर | ८२ |
| ५४ | सोलापूर उपनगरीय | ४२८ |
| ५५ | सातारा | १८० |
| ५६ | सांगली | ४८६ |
| ५७ | सांगोला | २५४ |
| ५८ | शेवगाव | १०६ |

| | | |
|---|---|---|
| ५९ | ठाणे | १७२ |
| ६० | तळेगांव — दाभाडे | ३७५ |
| ६१ | तुळजापूर | ६५ |
| ६२ | उस्मानाबाद | १०२ |
| ६३ | वाशी | १०३ |
| ६४ | वसई | ६१ |
| ६५ | वाशिम | २०० |
| ६६ | विटा | २०० |
| | **एकूण** | १८,९०३ |

# कार्यकारी समिती सभांची उपस्थिती (एकूण सभा ११)
# (१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६)

| क्र. | नाव | उपस्थिती |
|---|---|---|
| १. | श्री. मोहन जोशी | १० |
| २. | श्री. प्रमोद भुसारी (दिनांक १३ सप्टेंबर २०१५ पर्यंत) | ३ |
| ३. | श्री. दीपक करंजीकर | ९ |
| ४. | श्रीमती लता नार्वेकर | १० |
| ५. | श्री. भाऊसाहेब भोईर | ८ |
| ६. | श्री. सुनिल वणजु | ८ |
| ७. | श्री. नवनाथ कांबळी | ४ |
| ८. | श्री. प्रफुल्ल महाजन | १० |
| ९. | श्री. सतीश लोटके | ८ |
| १०. | श्री. श्रीपाद जोशी | ७ |
| ११. | श्री. सुनिल ढगे | ११ |
| १२. | श्री. दिलीप देवरणकर | ११ |
| १३. | श्री. किशोर आयलवार | ६ |
| १४. | श्रीमती वीणा लोकूर | ७ |
| १५. | श्री. विजय केंकरे | २ |

### आणि निमंत्रित

१. श्री. दिगंबर आगाशे
२. श्री. कृष्णा जाधव
३. ॲड. समीर गुप्ते
४. श्री. दिलीप कोरके

### घटक संघटना

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेशी संलग्न असलेल्या रंगभूमीशी संबंधितांच्या खालीलप्रमाणे संघटना कार्यरत आहेत.

१. मराठी नाटय व्यावसायिक निर्माता संघ २. हौशी रंगमंच संघटना ३. रंगमंच कामगार संघ
४. मराठी नाटककार संघ ५. मराठी नाटय कलाकार संघ ६. नाटय व्यवस्थापक संघ

## शोक समाचार :

अहवालसाली रंगभूमीशी संबंधित अशा ज्या व्यक्तींचे दु:खद निधन झाले, त्या सर्व व्यक्तींच्या कुटुंबियांच्या दु:खात अखिल भारतीय मराठी नाटय परिषद सहभागी आहे.

## अभिनंदन

अहवालसाली रंगभूमीशी संबंधीत अशा ज्या व्यक्ती अगर संस्था विविध पुरस्कारांनी सन्मानित झाल्या, त्या सर्वांचे अखिल भारतीय मराठी नाटय परिषद मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे.

# नियामक मंडळ – सभांना सदस्यांची उपस्थिती
# एकूण सभा ६
(दिनांक १ एप्रिल २०१५ ते दिनांक ३१ मार्च २०१६)

| नाव | उपस्थिती |
|---|---|
| श्री. मोहन जोशी | ६ |
| श्री. प्रमोद भुसारी | ५ |
| श्री. दीपक करंजीकर | ५ |
| श्रीमती लता नार्वेकर | ५ |
| श्री. भाऊसाहेब भोईर | ५ |
| श्री. सुनिल वणजु | ४ |
| श्री. नवनाथ कांबळी | २ |
| श्री. दिलीप देवरणकर | ६ |
| श्री. सतीश लोटके | ४ |
| श्री. प्रफुल्ल महाजन | ४ |
| श्री. सुनिल ढगे | ६ |
| श्री. श्रीपाद जोशी | ३ |
| श्री. किशोर आयलवार | ४ |
| श्रीमती वीणा लोकूर | ४ |
| श्री. भरत लोळगे | २ |
| श्रीमती नीना कुलकर्णी | – |
| श्रीमती सुकन्या कुलकर्णी–मोने | ३ |
| श्री. विजय केंकरे | २ |
| डॉ. गिरीष ओक | २ |
| श्री. अरूण नलावडे | – |
| श्रीमती वंदना गुप्ते | – |
| श्री. चंद्रकांत कुलकर्णी | १ |
| श्री. अशोक हांडे | १ |
| श्री. राजन भिसे | १ |
| श्री. दिलीप कोरके | ४ |
| श्री. समीर हंपी | – |
| श्री. सुनिल महाजन | ४ |
| श्री. शफी नायकवडी | ३ |
| श्री. राजेंद्र जाधव | ६ |
| श्री. उदय सामंत (दिनांक ११ जुलै २०१५ पर्यंत) | १ |
| श्री. श्रीकृष्ण दळी | २ |
| श्रीमती आसावरी शेटये | ५ |
| श्री. नाथा चितळे | ४ |
| श्री. अशोक ढेरे | १ |
| ॲड. पराग लुले | ५ |
| श्री. शिवाजी शिंदे | ५ |
| श्री. दिलीप दळवी | ६ |
| श्री. विजय कदम | २ |

**घटक संघटना प्रतिनिधी**

| | |
|---|---|
| श्री. सुशांत शेलार | ३ |
| श्री. रत्नकांत जगताप (दिनांक १३ सप्टेंबर २०१५) | – |
| श्री. विष्णू जाधव (१८ ऑक्टोबर २०१५ पासून) | २ |
| श्री. शशिकांत मोरे | ३ |
| श्री. प्रभाकर (गोटया) सावंत | ४ |
| श्री. किरण कामेरकर | २ |

## अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व कलावंत मेळावा.

प्रतिवर्षी **नाटककार गो.ब. देवल** यांच्या स्मृतिप्रित्यर्थ **१४ जून** रोजी **वार्षिक पारितोषिक वितरण** समारंभाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी पुरस्कारांची पूर्नरचना करण्यात आली असून एकूण ६९ पुरस्कारांची पूर्नरचना करून एकूण ३८ पुरस्कार देण्यात आले. या वर्षीपासून हा सोहळा दोन भागात घेण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे दिनांक १४ जून आणि ८ नोव्हेंबर २०१५ या दोन दिवशी हा सोहळा सादर करण्यात आला. दिनांक १४ जून २०१५ रोजी सकाळी ११.००वाजता निवेदिता, चंद्रपूर यांचे ‘चिंधी बाजार’ हे हौशी राज्य नाटय स्पर्धेच्या अंतिम फेरीतील प्रथम पुरस्कार विजेते नाटक सादर करण्यात आले. दु. ३.००वाजता ‘संगीत स्वयंवर’ नाटकाला शंभर वर्ष पूर्ण झाल्याबद्दल राधाकृष्ण कलामंच, रत्नागिरी यांचे ‘संगीत स्वयंवर’ नाटक सादर करण्यात आले. त्यानंतर सायं. ७.००वा. पुरस्कार वितरण सोहळा आणि कार्तिकी गायकवाड, प्रथमेश लघाटे, मुग्धा वैशंपायन आणि मधुरा दातार यांचा गायनाचा कार्यक्रम सादर केला. श्री. जयंत सावरकर आणि श्रीमती सुलभा देशपांडे यांना जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. त्यांना देण्यात आलेल्या पुरस्काराची रक्कम प्रत्येकी रू. २५०००/— त्यांनी नाटयपरिषदेला देणगी म्हणून दिली. श्री. गुरूनाथ दळवी यांनी त्यांना मिळालेल्या रू. ५०००/— पुरस्कारामध्ये वैयक्तिक रू. ५०००/— भरून एकूण रू. १००००/— देणगी नाटयपरिषदेला दिली. तसेच अनेक नामवंत कलावंतांचे पारितोषिके देवून सन्मान करण्यात आले. या सोहळयाला रंगभूमीवरील बहुसंख्य रंगकर्मी उपस्थित होते.

रंगभूमी दिनाचे औचित्य साधून पुरस्कार वितरण समारंभाचे दुसरे सत्र दिनांक ८ नोव्हेंबर २०१५ रोजी संपन्न झाले. सकाळी १०.३० वाजल्यापासून सायं. ६.००वाजेपर्यंत नाटयपरिषदेच्या बारा शाखांचे मनोरंजनाचे विविध कार्यक्रम आणि पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.

## नाटयलेखन स्पर्धा

९६ व्या नाटय संमेलनाच्या निमित्ताने रंगभूमीच्या अभिवृद्धीसाठी नाटयलेखन स्पर्धा आयोजित केली होती. त्यात एकूण ३४ संहिता पाठविण्यात आल्या होत्या. या स्पर्धेचे परिक्षक म्हणून डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली, श्री. दत्ता पाटील आणि श्री. नितीन नायगांवकर यांनी काम पाहिले. दिनांक ८ नोव्हेंबर २०१५ रोजी पुरस्कार वितरण सोहळयात नाटयलेखन स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार देण्यात आले. नाटयलेखन स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :

द्वितीय क्रमांक रू. ११,०००/— आणि प्रशस्तीपत्रक
नाटक संगीत समेट — श्री. वसंत प. केतकर
तृतीय क्रमांक रू. ७,०००/— (विभागून) आणि प्रशस्तीपत्रक
नाटक — संगीत डब्बल लाईफ — श्री. रविंद्र भगवते
नाटक — मुखवटा — श्री. कुमार बडगुजर
उत्तेजनार्थ
नाटक — एका उत्तराची कहाणी — अरविंद लिमये
परिक्षकांनी एकमताने प्रथम क्रमांकाची निवड केली नाही. प्रतिवर्षी नाटय संमेलनाचा उपक्रम म्हणून घेण्यात येणाऱ्या नाटयलेखन स्पर्धेतील नाटयसंहितांची बॅंक तयार

करण्यात आली असून ज्यांना नाटयसंहिता वाचावयाची असेल त्यांना ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात बसून वाचता येते व प्रत हवी असल्यास लेखकाच्या परवानगीने ती उपलब्ध होवू शकते.

## नाटय अभिनय, तंत्र विषयक कार्यशाळा

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेतर्फे दिनांक २७ जून २०१५ ते दिनांक ११ जुलै २०१५ या कालावधीत नाटय अभिनय, तंत्र विषयक कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेत २४ शिबीरार्थी सहभागी झाले होते. या कार्यशाळेत लेखन, दिग्दर्शन अभिनय, नेपथ्य पार्श्वसंगीत प्रकाशयोजना इत्यादी रंगभूमी सर्वांगाचे मार्गदर्शन सर्वश्री राजन भिसे, राजन ताम्हाणे, शेखर ताम्हाणे, अभिराम भडकमकर, जयंत पवार, कृष्णा बोरकर, सुनिल देवळेकर, जयदीप आपटे आणि श्रीमती इला भाटे यांनी केले.

तसेच शिबीरार्थींना व्यावसायिक नाटके दाखविण्यात आली. नाटकांनंतर त्या नाटकातील कलावंत, तंत्रज्ञ यांच्याशी चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे संयोजन श्रीमती विद्या पटवर्धन आणि डॉ. अनिल बांदिवडेकर यांनी केले.

## शाखांतर्गत एकांकिका स्पर्धा

प्रतिवर्षीप्रमाणे अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेतर्फे कै.प्रा.डॉ. लक्ष्मणराव देशपांडे यांच्या स्मरणार्थ शाखा अंतर्गत एकांकिका स्पर्धा आयोजित केली होती. त्याला चांगला प्रतिसाद लाभला आणि प्राथमिक फेरीसाठी एकूण सव्वीस शाखांनी भाग घेतला. या स्पर्धेची प्राथमिक फेरी माटुंगा केंद्रावर दिनांक १९ ऑगस्ट २०१५, नांदेड केंद्रावर दिनांक २१ ऑगस्ट २०१५ आणि अहमदनगर, इस्लामपूर केंद्रावर दिनांक २३ ऑगस्ट २०१५ रोजी संपन्न झाली. प्राथमिक फेरीसाठी परिक्षक म्हणून श्री. प्रभाकर(गोटया) सावंत, श्री. पंकज चेंबूरकर, ॲड. देवेंद्र यादव, श्री. केशव देशपांडे, श्रीमती वीणा लोकूर, रविंद्र कुलकर्णी, श्री. शशिकांत चौधरी, श्री. अरूण पटवर्धन यांनी काम पाहिले. स्पर्धेची अंतिम फेरी दिनांक ९ स्पटेंबर २०१५ रोजी यशवंत नाटय मंदिर येथे संपन्न झाली. अंतिम फेरीसाठी एकूण आठ एकांकिका सादर करण्यात आल्या. त्यातून खालील एकांकिकांना बक्षिसे देवून गौरविण्यात आले.

१. प्रथम – नाशिक शाखा – कस्टमर केअर
२. द्वितीय – चिंतामणीनगर शाखा – नथिंग टू से
३. तृतीय – नागपूर महानगर शाखा – क्षितीजाच्या पलिकडे

अंतिम फेरीसाठी परिक्षक म्हणून श्री. मिलींद शिंदे, श्री. राजन भिसे आणि श्रीमती रेश्मा गोखले यांनी काम पाहिले. सदर बक्षिसपात्र एकांकिका ९६ व्या नाटय संमेलनात सादर करण्यात आल्या.

## कै. वसंत जाधव राज्यस्तीरय खुली एकांकिका स्पर्धा

नाटयपरिषदेचे निरलस कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नाटककार 'कै. वसंत जाधव' यांच्या स्मरणार्थ प्रतिवर्षी होणारी एकांकिका स्पर्धा या वर्षापासून नाटय परिषदेने राज्यस्तरीय स्वरूपात आयोजित केली. त्याला उदंड प्रतिसाद लाभला आणि प्राथमिक फेरीसाठी एकूण ७० संस्थांनी भाग घेतला. या स्पर्धेची प्राथमिक फेरी माटुंगा केंद्रावर दिनांक ९ ते ११ ऑक्टोबर २०१५ रोजी, नागपूर केंद्रावर दिनांक १४ व १५ ऑक्टोबर २०१५ रोजी, अहमदनगर केंद्रावर दिनांक १७ ऑक्टोबर २०१५ रोजी, अमरावती आणि कोल्हापूर केंद्रावर दिनांक १८ ऑक्टोबर २०१५ आणि जळगांव केंद्रावर दिनांक १९ ऑक्टोबर २०१५ रोजी संपन्न झाली. प्राथमिक फेरीसाठी परिक्षक म्हणून श्री. सतीश सलागरे, श्री. चंद्रकांत मेहेंदळे, डॉ. सतिश पावडे, श्री. संजय पाटील—देवळणकर, श्री. जयंत शेवतेकर, श्री. श्याम शिंदे, श्री. आनंद खरबस, श्री. अरूण पटवर्धन, श्री. गोविंद जोशी, श्री. ईश्वर जगताप, श्री. अनिल वलाखेकर, आणि डॉ. माणिक वडळकर यांनी काम पाहिले. स्पर्धेची अंतिम फेरी २६ आणि २७ ऑक्टोबर २०१५ रोजी यशवंत नाटयमंदिर येथे संपन्न झाली. अंतिम फेरीमध्ये एकूण १२ एकांकिका सादर करण्यात आल्या. त्यातून खालील एकांकिकांना बक्षिसे देवून गौरविण्यात आले.

१. प्रथम — 'जून जुलै' — जिराफ थिएटर
२. द्वितीय — 'सेल्फी' — अभिनय, कल्याण.
३. तृतीय — 'द कॉन्शस' — माय माऊली.

अंतिम फेरीसाठी परिक्षक म्हणून श्री. भारत तांडेल, श्रीमती विद्या करंजीकर आणि श्री. हेमंत भालेकर यांनी काम पाहिले. सदर बक्षिसपात्र एकांकिकाही ९६ व्या नाटय संमेलनात सादर करण्यात आल्या.

दोन्ही एकांकिका स्पर्धांचे आयोजक म्हणून नाटयपरिषदेतर्फे श्री. शिवाजी शिंदे, श्रीमती गीता सोमण आणि श्री. दिगंबर आगाशे यांनी काम पाहिले.

## पहिले बालनाटय संमेलन, सोलापूर

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेने या वर्षापासून प्रतिवर्षी अखिल भारतीय मराठी बालनाटय संमेलन आयोजित करण्याचे ठरविले. या वर्षाच्या पहिल्या बालनाटय संमेलनाचे आयोजन नाटयपरिषदेच्या सोलापूर उपनगरीय शाखेला देण्यात आले. पहिले बालनाटय संमेलन दिनांक २६ ते २९ नोव्हेंबर २०१५ रोजी संमेलनाध्यक्षा सौ. कांचन सोनटक्के यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरित्या संपन्न झाले. या संमेलनात बालनाटय व इतर मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करण्यात आले. या संमेलनाचे संयोजन निमंत्रक तथा समिती प्रमुख सहकार्यवाह श्री. भाऊसाहेब भोईर आणि समिती सदस्य श्री. सुनिल महाजन, विजय केंकरे, सुनिल ढगे, नाथा चितळे, दिलीप देवरणकर, किशोर आयलवार, सतीश लोटके, दिलीप कोरके आणि कृष्णा जाधव यांनी केले. श्री. कृष्णा जाधव यांनी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

## गरजू रंगकर्मीसाठी आर्थिक मदत

नाटयपरिषदेने सुरू केलेली गरजू रंगकर्मींना मासिक अनुदान योजना आणि मानधन योजना व्यवस्थीत कार्यान्वीत असून त्या अंतर्गत ४१ रंगकर्मींना मासिक अनुदान देण्यात येते. नाटयपरिषदेतर्फे ५७१ रंगमंच कामगारांचा स्टार हेल्थ ॲण्ड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडतर्फे ॲक्सिडन्ट पॉलिसी शेडुल–ग्रुप या पॉलीसी अंतर्गत विमा उतरविला असून त्याचा संपूर्ण प्रिमियम नाटय परिषदेने भरला आहे. नाटय परिषदेतर्फे गरजू रंगकर्मींना वेळोवेळी आर्थिक मदत करण्यात येते. यावर्षी श्री. सुरेश चिखले आणि श्री. विवेक पणशीकर यांना रू. १५०००/– (रूपये पंधरा हजार फक्त) श्री. बाबा पार्सेकर यांच्या अमृत सोहळयाला रू. ११०००/– (रूपये अकरा हजार फक्त) इतकी आर्थिक मदत देण्यात आली. ज्या रंगमंच कामगारांच्या मुलांना शालांन्त परिक्षेत ६० टक्यांपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत, त्यांच्या पुढील शिक्षणासाठी नाटय परिषदेतर्फे आर्थिक मदत करण्यात येते.

नाटय परिषदेतर्फे यावर्षी कु. महेश भरत वर्दम, कु. समीक्षा प्रमोद मुळुक आणि कु. दिपाली किशोर पिंगळे यांना अनुक्रमे रू. १४,७७०/–, ३०,५२०/– व ३७,६२०/– इतकी शैक्षणिक मदत करण्यात आली.

## उल्लेखनीय कार्य

१. नाटयपरिषदेच्या वेबसाईटचे काम पूर्ण झाले असून www.natyaparishad.org या संकेतस्थळावर ती आपण पाहू शकता. भारतात जिथे नाटयविषयक चळवळ आहे तिथे ती अधिक जोमाने सुरू व्हावी, त्याला चालना मिळावी, यासाठी तिथे नाटय परिषदेच्या शाखा सुरू करण्याबाबतही प्रयत्न सुरू आहेत. नाटयपरिषदेच्या नांदेड–दक्षिण, नागपूर महानगर, अंबाजोगाई, सोलापूर महानगर, महाबळेश्वर, ऐरोली, लातूर महानगर, इचलकरंजी, मुक्ताईनगर येथे नवीन शाखा सुरू करण्यात आल्या आहेत.

## यशवंत नाटयमंदिर

आपल्या यशवंत नाटय मंदिरात एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ पर्यंत एकूण ६८० कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात मराठी नाटके, मराठी कार्यक्रम, इतर भाषिक कार्यक्रम, शुटींग, सभा इत्यादींचा समावेश आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक नामवंत व प्रसिद्ध व्यक्तीनी नाटयगृहास भेट दिली. नाटय संकुलाच्या नूतनीकरणासाठी पंच्याहत्तर लाखाचा मंजूर निधी मिळण्यासाठी संकुलाच्या नूतनीकरणाच्या खर्चाचा संपूर्ण तपशील पाठविण्यात आला आहे. तो लवकरच प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे.

# ९६ वे नाटय संमेलन २०१६
# ठाणे

९६ व्या नाटय संमेलनाच्या निमित्ताने रंगभूमीच्या अभिवृध्दिसाठी नाटयलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतील **प्रथम क्रमांक रू. २१,०००/—, व्दितीय क्रमांक रू. ११,०००/—, तृतीय क्रमांक रू.** ७,०००/— व **विशेष पुरस्कार** म्हणून रू. ३,०००/— आणि **उत्तेजनार्थ** पुरस्कार प्रत्येकी **रू.** १,०००/— अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत.

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचे **'९६ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलन' ठाणे शाखेच्या विद्यमाने 'ठाणे'** येथे दि. १९ फेब्रुवारी ते दि. २१ फेब्रुवारी २०१६ या काळात ज्येष्ठ नाटककार श्री. गंगाराम गवाणकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या सोहळयात विविध करमणूकीचे कार्यक्रम सादर करण्यात आले. या सोहळयाचा **उद्‌घाटन समारंभ शुक्रवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०१६ रोजी सायं. ७.०० वाजता हिंदूह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नाटय नगरी, नटवर्य मामा पेंडसे रंगमंच (दादोजी कोंडदेव क्रिंडागण) ठाणे येथे आणि समारोप सोहळा रविवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१६ रोजी सायं.** ५.०० **वा.** संपन्न झाला.

९६ व्या नाटयसंमेलनाप्रित्यर्थ ठाणे येथे दिनांक १२ फेब्रुवारी २०१६ ते १८ फेब्रुवारी २०१६ पर्यंत स्थानिक लोकांसाठी विविध नाटके व कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात संगीत कटयार काळजात घुसली (नाटक), तेजोमय रूक्मिणी हा संगीत स्वयंवर या नाटकाच्या शताब्दीनिमित्त विशेष कार्यक्रम, शेवग्याच्या शेंगा (नाटक), सप्तसूर झंकारीत बोले (संगीतमय कार्यक्रम), सोबतीने चालताना (नाटक) सन्यस्त ज्वालामुखी (नाटक), तिन्ही सांज (नाटक), मंगळावर स्वारी (बालनाटय), बॅन्क ऑफ बालपण (बालनाटय), बायांनो नवरे सांभाळा (नाटक), गाढवाचं लग्न (वगनाटय), विक्रम मोहिनी राजवाडे (नाटक), ठाणे तिथे काय उणे (सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश होता. तलावपाळी येथे पहाटे ६.०० वाजता श्री. राहुल देशपांडे व श्री. आनंद भाटे यांनी सादर केलेले नाटयसंगीत व ९.०० वाजता तीन बालनाटये सादर करण्यात आली.

## शुक्रवार, १९ फेब्रुवारी २०१६

नाटयदिंडीचे मुख्य रंगमंचावर आगमन झाल्यानंतर सायं. ७.०० वाजता शिवसेना पक्षप्रमुख श्री. उद्धवजी ठाकरे यांच्या शुभहस्ते ९६ व्या नाटयसंमेलनाचे उद्‌घाटन करण्यात आले. अध्यक्षा होत्या श्रीमती फैयाज शेख आणि स्वागताध्यक्ष होते मा.ना.श्री. एकनाथ शिंदे. त्यानंतर नियोजित संमेलनाध्यक्ष मा.श्री. गंगाराम गवाणकर यांच्याकडे संमेलनाध्यक्ष पदाची सूत्रे सोपविण्यात आली.

दु. ४.०० वाजता 'बुद्धम शरणंम' हा कार्यक्रम रंगकर्मी अशोक साठे रंगमंचावर (डॉ. काशिनाथ घाणेकर नाटयगृह, ठाणे) येथे व उद्‌घाटनानंतर 'शिवसोहळा' हे शिवाजी महाराजांच्या जीवनावरील महानाटय नंदेश उमप यांनी सादर केले.

## शनिवार, दिनांक २० फेब्रुवारी २०१६

पहाटे ६.००वाजता, मासुंदा तरंगमंच (तलाव पाळी), ठाणे येथे श्री. सुबोध भावे व महेश काळे यांचा 'सुर निरागस होवो' नाटयसंगीताचा कार्यक्रम व सायंकाळी ५.०० वाजता विविध कलाविष्कार सादर करण्यात आले. स. ९.०० वाजता नाटककार शाम फडके रंगमंच (राम गणेश गडकरी रंगायतन ठाणे) येथे तीन बालनाटये दु. ४.०० वाजता संमेलनाध्यक्ष श्री. गंगाराम गवाणकर यांची मुलाखत आणि 'चित्रांगदा' हे नवीन नाटक सादर करण्यात आले. मुख्य रंगमंचावर स. ९.३० वाजता 'आमची बोली

आमचा बाणा', स. ११.३० वाजता 'परिसंवाद' नाटय व्यवसायाची ''इंडस्ट्री' कशी होणार?' दु. ३.०० वाजता 'मराठी रंगभूमीचा पूर्वरंग — चित्रकथी, कळसूत्री बाहुल्या, दशावतार, भारूड, पोवाडे आणि पारंपारिक लावण्या', सायं. ५.००वाजता परिसंवाद — 'नाटकाचे माध्यमांतर काय हरवतं काय गवसतं' व सायं. ६.३०वाजता 'कलारजनी' सादर करण्यात आली. रंगकर्मी अशोक साठे रंगमंच येथे स. ९.३० वाजता एकांकिका व सायं. ५.०० वाजता 'स्पिरीट' (नाटक), स. १० ते दु. १.०० वा. रंगकर्मी दिलीप पातकर रंगमंच (डॉ. काशिनाथ घाणेकर मिनी थिएटर) येथे नाटय परिषदेच्या शाखांचे विविध कार्यक्रम व दु. ४.३० वाजता 'तुझ्या सवे तुझ्या विना' (नाटक), स. १० ते दु. ४ वाजेपर्यंत अभिनेते शशी जोशी रंगमंच (टाऊन हॉल) येथे एकपात्री आविष्कार सादर करण्यात आले.

## रविवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१६

दादोजी क्रिडांगण प्याव्हेलीयन येथे स. १०.३० वाजता विषय नियामक समितीची सभा घेण्यात आली.

स. ६.०० वाजता मासुंदा तरंगमंच येथे 'विठ्ठल विठ्ठल' हा शौनक अभिषेकी व मंजुषा पाटील—कुलकर्णी यांचा संगीताचा कार्यक्रम व सायं. ५.०० 'विविध कलाविष्कार' हे कार्यक्रम सादर करण्यात आले. स. ९.३० वाजता नाटककार शाम फडके रंगमंच येथे 'भरारी—कर्णबधीर मुलांचा नाटयविष्कार व वंचितांचा रंगमंच' या पारितोषिक विजेत्या तीन नाटीका, दु. ४.३० वाजता विविध शाखांचे कार्यक्रम आणि रात्रौ ८.३० वाजता 'लग्नाची बेडी' (नाटक), स. १०.०० वाजता अशोक साठे रंगमंच येथे 'बंद भाव कळयांचे' (दीर्घांक), स. ११.३० वाजता 'सखी गं सखी' (दीर्घांक), दिलीप पातकर रंगमंच येथे स. १०.०० वाजता पारितोषिक विजेत्या एकांकिका, मुख्य रंगमंचावर स. ९.३०वाजता अभिनेते शरद पोंक्षे यांच्याशी मुक्त संवाद, स. ११.३० वाजता 'परिसंवाद — गेला तरूण प्रेक्षक कुणीकडे', दु. २.०० वाजता 'वारसा असा लाभला' शाहिर साबळे ॲकॅडमीचा कार्यक्रम, दु. ४.०० वाजता 'खुले अधिवेशन', सायं. ५.०० वाजता ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाटय संमेलनाचा समारोप सन्माननिय प्रमुख पाहुणे मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्ष होते मा.श्री. गंगाराम गवाणकर. सायं. ७.०० वाजता नाटय परिषद रजनी हा विविध रंगकर्मींचा सहभाग असलेला कार्यक्रम सादर करण्यात आला.

# आभार

१. मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
२. मा.ना.श्री. विनोद तावडे, सांस्कृतिक कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
३. मा.ना.श्री. सुधीर मुनगंटीवार, अर्थमंत्री, महाराष्ट्र राज्य.
४. मा.ना.श्री. शरदचंद्र पवार, माजी केंद्रिय कृषिमंत्री, भारत सरकार.
५. मा.ना.श्री. सुशिलकुमार शिंदे, माजी गृहमंत्री, भारत सरकार.
६. मा.श्री. मनोहरपंत जोशी, खासदार, माजी लोकसभा अध्यक्ष,
७. मा.ना.श्री. नारायण राणे, माजी उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य.
८. मा.ना.श्री. अजितदादा पवार, माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
९. मा.श्री. छगन भुजबळ, माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
१०. मा. श्री. सुनिल तटकरे, माजी अर्थमंत्री, महाराष्ट्र, राज्य
११. मा.श्री. उदय सामंत, माजी न्याय विधी राज्यमंत्री, महाराष्ट्र, राज्य
१२. मा.श्रीमती सुप्रिया सुळे, खासदार.
१३. मा.श्री. हेमंत टकले, आमदार,
१४. मा.श्रीमती स्नेहल आंबेकर, महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका.
१५. मा. सचिव, सांस्कृतिक कार्य.
१६. मा. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन.
१७. मा. स्थानिक, नगरसेवक.
१८. मा.श्री. शशी प्रभू, वास्तुशास्त्रज्ञ आणि त्यांचे सहकारी.
१९. मा.श्री. दत्तात्रय म्हैसकर
२०. मा. व्यवस्थापक, बॅन्क ऑफ महाराष्ट्र, कटारिया मार्ग शाखा, माहिम.
२१. मा. व्यवस्थापक, दि. सारस्वत को.ऑ. बॅक लि., मधुकेंद्र शाखा, दादर, मुंबई.
२२. मा. व्यवस्थापक, कॉसमॉस बॅक, दादर शाखा.
२३. मा. व्यवस्थापक, मुंबई बॅक, माहिम शाखा.
२४. मा. व्यवस्थापक, बॅन्क ऑफ इंडिया, शिवाजी पार्क शाखा
२५. मा. व्यवस्थापक, कार्पोरेशन बॅन्क, शिवाजी पार्क शाखा
२६. मुंबई, पुणे, नागपूर, नासिक, सांगली कोल्हापूर, सातारा तसेच उर्वरित महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्रे त्यांचे संपादक व वार्ताहर.
२७. आकाशवाणी, सहयाद्री व विविध वाहिन्यांचे संचालक, महाराष्ट्रातील सर्व नाटयगृहे, त्यांचे संचालक मंडळ व व्यवस्थापक.
२८. मा.श्री. रवि सावंत, हिशेब तपासनीस.
२९. बी.वाय.पाध्ये पब्लिसिटी प्रा.लि.
३०. श्री. दिगंबर आगाशे, श्री. धनंजय साळगावकर, श्री. प्रफुल्ल कारेकर, श्री. कृष्णा जाधव आणि श्रीमती गीता सोमण.
३१. परिषदेच्या सर्व शाखा व त्यांचे सभासद.
३२. परिषदेच्या सर्व कार्यक्रमात भाग घेणारे निर्माते, कलावंत, नाटककार, रंगमंच कामगार, संगीत साथीदार, तंत्रज्ञ, वक्ते प्रमुख पाहुणे, अध्यक्ष, सर्व सहाय्यक, सर्व घटक संस्था व त्यांचे पदाधिकारी, देणगीदार, विश्वस्त, हितचिंतक, आश्रयदाते, कर्मचारी वर्ग आणि सर्व रसिक प्रेक्षक.